Dr Ande L.P ISSN 2017-18 International

International Research Fellow Association's

February - 2018

E-ISSN: 2321-4953

IRFA'S

# UNIRESEARCH

## Multidisciplinary International E-Research Journal

Vol.- X Issue - II

*Indexed in DRJI & Indian Citation Index* *Double Blind Peer Reviewed Journal*

UGC Approved List No. 63005 *Cosmos Impact Factor - 3.020 [2015]*

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all

Home About Us Organization Commission Universities Colleges Publications

UGC Approved List of Journals

You searched for **uniresearch**

Total Journals : 1

Show 25 entries Search:

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| View | 1 | 63005 | Uniresearch- Multidisciplinary International E-Research Journal | International Research Fellows Association | 23214953 | |

Showing 1 to 1 of 1 entries

Previous 1 Next

For Students For Faculty More

**Chief Editor :**

Dr. Dhanraj Dhangar,
Deptt. of Marathi,
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist. Nashik.[M.S.] India
Email: dhanrajdhangar@gmail.com
Mob. 7775982534

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

*For Details, visit us on: www.uniresearch.net.in*

'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal | ISSN 2321-4953
UGC Approved List No. 63005 *Impact Factor - 3.020* | (Online)
Vol. 10 Issue. 2 | February - 2018


| | | | |
|---|---|---|---|
| 23 | गोर संवेदना अभिव्यक्त करणारा लेखक : रावजी राठोड | - प्रा. व्ही. बी. राठोड | 124 |
| 24 | ग्रामीण कथाकार व्यंकटेश माडगुळकर | - सुनिता मोटे | 129 |
| 25 | मला उध्वस्त व्हायचंय : एक चिंतन | - प्रा. अनिता वाळके | 134 |
| 26 | 'नाच ग घुमा' मधील स्त्री चित्रण | - कविता पाटील व डॉ. मनीषा नेसरकर | 137 |
| 27 | वैदिक जीवन व्यवस्थापन | - प्रा. संजीवनी नेरकर | 142 |
| 28 | स्त्रिया आणि शुद्रातिशुद्रांच्या शिक्षणाच्या प्रणेत्या : ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले | – डॉ. अनिल पवार | 147 |
| 29 | महात्मा गांधींचे स्त्री सबलीकरण विषयक विचार | - डॉ. आर. बी. शेटे | 151 |
| 30 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्त्री विषयक विचार | - प्रा. नेमीचंद चव्हाण | 155 |
| 31 | भारतातील स्त्री हिंसा आणि मानवी हक्क | - श्रीमती सुप्रिया देसाई | 163 |
| 32 | सम्राट अशोकाचा धम्म व आधुनिक इतिहासातील योगदान | - सुनिता पाटील | 166 |
| 33 | भारतातील बौद्ध स्तूप : एक चिकित्सक अभ्यास | - प्रा. लता आंदे | 170 |
| 34 | स्वतंत्र भारतातील समाज वादाचे स्वरूप | - प्रा. रजनी बोबडे | 176 |
| 35 | भारतीय समाजातील कुपोषणाची सद्य स्थिती | - डॉ. विलास चव्हाण | 180 |
| 36 | शासनाची मनोधैर्य योजना : एक समाज शास्त्रीय विश्लेषण | - प्रा. जगदीश ससाणे | 184 |
| 37 | महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग आणि निवडणूक सुधारणा | - हणमंत पचलिंग | 189 |
| 38 | जल-व्यवस्थापन : एक अध्ययन | - डॉ. सुरेश बन्सपाल | 192 |
| 39 | डी स्पेस प्रणाली आधुनिक पद्धतीने माहिती संग्रहण : जतन आणि प्रतीप्राप्ती करण्यास उपयोगी | प्रा. हितेश ब्रिजवासी व प्रा. दीपक घुगे | 195 |
| 40 | २१ वे शतकातील शैक्षणिक ग्रंथालयासाठी विपणन एक वरदान | – श्रीमती प्रीती पाटील | 201 |
| 41 | वाचक व त्यांच्या वाचन सवयी व बदलते ग्रंथालय | - श्री. अनिकेत वारूळकर | 209 |
| 42 | 'गोदान' में महानगरीय और ग्रामीण जीवन कि यथार्थ प्रासंगिकता | – प्रा. शांताराम वळवी | 216 |
| 43 | गोर बंजारा समाज कि मान्यतायें | – डॉ. दत्ता जाधव | 221 |
| 44 | थर्ड जेंडर विमर्श ' और हिंदी नाटक | - डॉ. भानुदास आगेडकर | 226 |
| 45 | हिंदी साहित्य में दलित विमर्श | – नयन भादुले -राजमाने | 232 |
| 46 | वेबसाईट : स्वरूप एवं संकल्पना | - डॉ. दीपक तुपे | 235 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor-**

'Uniresearch'- International Multidisciplinary E-Research Journal | ISSN 2321-4953 (Online)
UGC Approved List No. 63005 *Impact Factor - 3.020*
Vol. 10 Issue. 2 | February - 2018

# भारतातील बौध्द स्तूप एक चिकित्सक अभ्यास

डॉ. आदे लता दिगंबर
शंकरराव जगताप कॉमर्स कॉलेज, वाघोली.
ता.कोरेगाव,जि.सातारा.
andelata67@gmail.com

बौध्द धर्म हा एक प्राचीन धर्म आहे. या धर्माचे संस्थापक [१] गौतम बुध्द आहेत. इ.स.पू. ६वे शतक हे भारताच्या इतिहासात 'धार्मिक क्रांतीचे युग' म्हणून ओळखले जाते. या काळात वैदिक धर्मात यज्ञ आणि कर्मकांडाचे महत्व वाढले.त्यामुळे सामान्य जनतेत धार्मिक असंतोष निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर भारतात इ.स. पू ६ व्या शतकात ६२ पंथ उदयास आले. त्यापैकी एक म्हणजे बौध्द धर्म होय. या धर्माचा भारतीय संस्कृतीवर फार मोठा प्रभाव पडलेला आहे. कला व स्थापत्य क्षेत्रात या धर्माची भारतीय संस्कृतीला फार मोठी देणगी मिळालेली आहे. तरी यात बौध्द स्तुप याचा चिकित्सक अभ्यास पुढीलप्रमाणे:

**बौध्द स्तूप :**

चैत्यगृह, विहार आणि स्तूप हे बौध्द वास्तुकलेचे तीन प्रकार पडतात. प्राचीन भारतीय कला आणि वास्तू कलेत हे तिनही वास्तु प्रकार प्रचलित झाले. महाराष्ट्रात भाजे ,कार्ले, अजिंठा , जुन्नर, पितळखोरा, धाराशिव, नाशिक व वेरूळ इत्यादी ठिकाणी डोंगर पोखरून अथवा खोदून चैत्यगृह, विहार आणि स्तूप या वास्तुंची निर्मिती केली गेली. चैत्यगृह, विहार व स्तूप जसे डोंगर खोदून तयार करण्यात आले. त्याचप्रमाणे विटा, दगड व मातीचा वापर करून चैत्यगृह, विहार आणि स्तूप निर्माण करण्यात आले.[२] काही स्तूप पुढीलप्रमाणे: वडगाव ,कंधार [३], तेर, [४] भरहूत, सांची [५], सारनाथ [६], अमरावती [७], पवनी [८], राजगीर [९]तारापूर [१०], या ठिकाणी आढळून आले.

बौध्द भिक्खूंच्या प्रार्थनागृहाला 'चैत्यगृह' [११] व निवासस्थानाला 'विहार' [१२] आणि 'स्तूप' [१३] हे बुध्दाचे प्रतिक समजले जात असे .हिनयान काळात बुध्द पूजा प्रचलित नव्हती, तर बुध्दाच्या काळात अनेक प्रतिकांची पूजा प्रचलित होती. त्या अनेक प्रतिकांपैकी एक म्हणजे स्तूप [१४] होय. स्तूप हे बुध्दाच्या 'निर्वाणाचे' [१५] प्रतिक समजले जात असे. नांदेड जिल्हयात केवळ कंधार परिसरातच स्तूपाचे अवशेष आढळून आले.

**स्तूप म्हणजे काय?**

प्रामुख्याने बौध्द स्मारकासाठी 'स्तूप' हा शब्द वापरला जातो. ओशांवर बांधलेले स्मारक [१६] म्हणजे 'स्तूप' होय. 'स्तूप' हा बौध्द धर्माशी संबंधित असलेला एक वास्तु प्रकार आहे. 'स्तूप' म्हणजे एखादा महापुरूषांची विशिष्ट आकाराची समाधी होय. या समाधीमध्ये त्या महापुरूषांचे शरीरावशेष ( अस्थी ) आणि त्याने वापरलेल्या वस्तुंचे अवशेष ठेवण्यात येत असत. थोडक्यात एखाद्या महापुरूषांच्या दफनानंतर त्याच्या स्मरणार्थ तयार केलेल्या वास्तुला अर्थात स्मारकाला 'स्तुप' अशी संज्ञा प्राप्त झाली. एखाद्या महापुरूषांची स्मारकरूप समाधी म्हणजे स्तूप अशीही स्तूपाची व्याख्या करता येते. 'स्तूप' हा संस्कृत शब्द आहे. 'जोडणे' किंवा एक करणे आणि प्रशंसा करणे किंवा स्तवन करणे' [१७] असे स्तूपाचे दोन अर्थ आहेत. त्यावरून लोकांची श्रध्दा असणारे स्मारक उभारणे असा स्तूपाचा अर्थ काढता येतो.

**स्तूपाचे प्रकार :**

'स्तूप' मुळात बुध्दाच्या निर्वाणाचे प्रतीक मानला जात असे. परंतु स्तुपाला इतके जास्त पावित्र मिळाले की, तो बुध्दाचा प्रतीक सुरूवातीलाच नव्हे तर पुढच्याही काळात मानला गेला. त्यामुळे देवमूर्तीची प्रतिष्ठापना करणे

जसे महान व पुण्याचे कार्य समजले जाऊ लागले तसेच स्तूप बनविणे, स्तूपाचा जीर्णोव्दार करणे व स्तूपाची पूजा, उपासना व वंदना करणे हेही पुण्यकर्म समजले जाऊ लागले. प्रत्येक स्तूपात पाच भौतिक अवशेषांचा धातुकरंडक ठेवणे कधीही शक्य नव्हते त्यामुळेच स्तूपाचे पुढील तीन प्रकार [१८] कल्पिले गेले.

१. शारिरीक स्तूप : शारिरीक अवशेषांवर बांधलेला स्तूप हा 'शारिरीक स्तूप' होय. या स्तूपात शरीर धातू असतात.

२. पारिभोगिक स्तूप : बौध्दाच्या किंवा श्रेश्ठ भिक्खूंच्या प्रतिनिधित्व अवशेषांवर बांधलेला स्तूप म्हणजे 'पारिभोगिक स्तूप' होय. गौतम बुध्दाच्या परिभोगात उश्णीव पात्र व वज्रासन इत्यादी वस्तु असत. यावर बांधलेले स्तूप हे 'पारिभोगिक स्तूप' समजले जातात.

३. उद्देशिक स्तूप : उद्देशिक स्तूप म्हणजे बौध्द प्रार्थना मंदिरे होत. बुध्द किंवा बुध्दकालीन बुध्द यांच्या स्मृतीत तयार केलेले स्तूप म्हणजे 'उद्देशिक स्तूप' होय .मध्ययुगात हा तिसरा प्रकार बराच वाढला. पवित्र बौध्द तीर्थ स्थानी गेल्यावर पूजेसाठी दगडाचे लहान लहान स्तूप बांधण्याची पध्दत रूढ झाली.

**स्तूप निर्मितीचा इतिहास :**

स्तूप निर्मितीला फार मोठा इतिहास आहे. इतिहासपूर्व काळात मृत व्यक्तीच्या शरीराचे दफन केल्यावर त्या अवशेषांवर मातीचा किंवा दगडांचा ढिगारा करण्याची प्रथा होती. यामधूनच स्तूपाचा विशिष्ट आकार उदयास आला. बौध्द युगाचा प्रारंभ होण्यापूर्वी स्मारक– चिन्हाच्या रूपाने स्तूप बनविले जात होते. वैदिक काळात राजे – महाराजांच्या शवावर ज्या ठिकाणी अंत्यसंस्कार केले जात होते. त्या ठिकाणी समाधीप्रमाणे अर्धवर्तुळाकार ढिगारा बनवून त्यामध्ये त्यांचे अवशेष सुरक्षित ठेवले जात होते. जैन संप्रदायातही अशी प्रथा अत्यंत प्राचीन काळात प्रचलित होती. [१९] मात्र बौध्द धर्मात यास विशिश्ट महत्व प्रदान करण्यात आले. अंत्यसंस्कार क्रियेनंतर संत, महंत व बोधिसत्वांच्या अस्थी सुरक्षित ठेवण्यासाठी स्मारके उभी करण्यास प्रारंभ झाला. अशी स्मारके म्हणजे 'स्तूप' होय. दीघनिकायच्या महापरिनिर्वाणामध्ये एक कथानक आहे. गौतम बुध्दांनी प्रिय शिष्य आनंद यास म्हटले की, ' भन्ते , माझ्या मृत्यूनंतर सार्वजनिक ठिकाणी स्तूप बनवून त्यामध्ये चक्रवर्ती सम्राटांच्या अवशेषांचे विसर्जन जसे केले जाते , त्याचप्रमाणे माझ्या अवशेषांचेही विसर्जन करावे'' [२०] गौतम बुध्दांच्या स्वयंनिर्णयामुळे बौध्द संघात स्तूप रचनेला विशिष्ट महत्व प्राप्त झाले. कालांतराने गौतम बुध्दांच्या प्रमुख शिष्यांच्या अवशेषांसाठीही स्तूंपाची निर्मिती करण्यात येऊ लागली. स्तूपामध्ये शरीरावशेष असल्यामुळे जनतेत स्तूपांबद्दल श्रध्दा व भक्ती निर्माण होऊ लागली. हळूहळु गौतम बुध्दांच्या जीवनाशी संबंधित महत्वपूर्ण घटना आणि बौध्द इतिहासाच्या घटनांच्या स्मृतीरूपानेही स्तूप बनविले जाऊ लागले. स्तूप निर्माण करणे हे पुण्यकार्य समजण्यात येऊ लागले. तसेच जो स्तुपाची वंदना, अर्चना व आराधना करू लागला. त्यास सुख लाभ होऊ लागला. अशा प्रकारे स्तूप हे श्रध्दा, भक्ती व उपासनेचे केंद्रबिंदू बनल्यामुळे त्यास 'चैत्य' अशी संज्ञा रूढ झाली.

**स्तूप निर्मितीचा प्रारंभ :**

चंद्रगुप्त मौर्याने [२१] इ.स.पू. ३२२ मध्ये मौर्य घराण्याची स्थापना केली. त्याने इ.स. पू. २९७ पर्यंत राज्य केले. याच घराण्यात सम्राट अशोक हा जगप्रसिध्द राजा होऊन गेला. बौध्द धर्माचा आश्रयदाता आणि प्रसारक म्हणून तो जगप्रसिध्द आहे. मौर्य सम्राट अशोकाने भारतात सर्वप्रथम स्तूप बांधण्यास प्रारंभ केला. अंत्यसंस्कार क्रियेनंतर संत,महंत व बोधिसत्वांच्या अस्थी सुरक्षित ठेवण्यासाठी स्मारके उभी करण्यास प्रारंभ झाला. त्यामुळे स्तुपाला एक धार्मिक पवित्रता प्राप्त झाली. मौर्य काळ हा हिनयान कालखंड होता. या काळात बुध्दांच्या मूर्तीची पूजा प्रचलित नव्हती. बौध्द अनुयांयानी या काळात मूर्तीपूजेऐवजी स्मारकपूजा स्वीकारली होती. गौतम बुध्दाच्या जीवनात ज्या ज्या ठिकाणी महत्वाचे प्रसंग घडले, त्या त्या ठिकाणी लहान मोठी स्मारके उभारण्यात आली.

लुंबिनी, बुध्दगया, सारनाथ, कुशीनगर, श्रावस्ती, सांची, राजगृह आणि वैशाली ही बुध्दाच्या जीवनात महत्वाचे प्रसंग घडलेली आठ ठिकाणे आहेत. ही आठ स्थळे बौध्द धर्मात ' अष्टमहास्थळे' म्हणून ओळखली जातात. या सर्व ठिकाणी अशोकाने स्तूप उभारले. त्यांनी बुध्दाच्या अवशेषांवर भारत आणि आणि भारताबाहेर ८४००० स्तूप [२२] बांधल्याचा उल्लेख अनुश्रुतीमध्ये आढळतो. अशोकानंतर ९०० वर्षांनी चिनी प्रवासी हुएनत्संग हा भारतात आला. तेव्हा अशोकाने बांधलेले शेकडो स्तूप त्याने चांगल्या अवस्थेत असलेले पाहिले होते. अशोकाने सुरू केलेली स्तूप बांधण्याची ही परंपरा पुढेही चालू राहिली. परंतु ती कमी प्रमाणात होती.

**स्तुपाचे स्वरूप व विधान :**

सुरूवातीचे स्तूपाचे स्वरूप आणि विधान म्हणजेच पदविन्यास भिन्न होता. नंतरच्या काळात मात्र स्तूपाच्या स्वरूप व विधानात बदल झाले. माती, विटा व दगडांनी बांधलेला एक अर्धगोलाकार ढिगारा हे स्तुपाचे प्रारंभिक स्वरूप व विधान होते. ''या ढिगा—याच्या मध्यभागात स्मारकरूप वस्तू आणि महापुरूषांच्या शरीराचे अवशेष ठेवण्यात येत असत. या अर्धगोलाकार ढिगा—यास 'अंड' म्हणत. ढिगा—याच्या माथ्यावर एक चौरस कटा असे, त्याला 'हर्मिका' म्हणत. त्याच्याभोवती कठडा असे त्याला 'वेदिका' म्हणत. वेदिकेच्या डोक्यावर एका खांबावर 'यष्टी' म्हणजेच 'छत्रावली' उभारीत. स्तुपाची पूजा केली जात असे. पूजेसाठी स्तूपाला प्रदक्षिणा घालण्यात येई. प्रदक्षिणा घालण्यासाठी स्तुपाभोवती मध्ये थोडे अंतर सोडून एक उंच कठडा उभारीत. या कठडयालाच 'प्रदक्षिणापथ' म्हणत. या कठडयालाच चार दिशांनी चार मोठे दरवाजे असत. हीच स्तूपाची प्रवेशव्दारे असून ती तोरणांनी सजविलेली असत. स्तुपाच्या जवळच ध्वजस्तंभही उभारत. ''[२३] अशाप्रकारे स्तुपाची रचना, स्वरूप, विधान आणि छेद असे. भरहूत, अमरावती, तेर, सारनाथ, सांची, पवनी, वडगाव आणि कंधार येथील स्तुपाचे विधान एकसारखे आहे. हे हिनयान काळातील स्तुपाचे स्वरूप व विधान आहे. महायान काळात मात्र स्तूप या वास्तु विधानात महत्वाचे फरक पडल्याचे आढळून येते.

**स्तूप कोठे बांधले?**

मौर्य सम्राट अशोकाने बौध्द धर्माच्या प्रचारासाठी दीर्घदृश्टी वापरून फार मोठे व उत्तम प्रयत्न केले. हे त्यांनी कोरलेल्या लेखांवरून स्पश्ट होते. उत्तरेतील गांधारपासून कन्याकुमारी म्हणजे ताम्रपर्णी नदीपर्यंत त्यांनी ब्राम्ही आणि पालीसारख्या प्राकृत भाशेतही लेख कोरून घेतले. हा अशोकाच्या दीर्घदृश्टीचा उत्तम पुरावा आहे. अशोकाच्या लेखनाबरोबरच त्याने उभारलेले बौध्द स्तूपही तितकेच महत्वाचे आहेत. गौतम बुध्दाच्या जीवनात ज्या ज्या ठिकाणी महत्वाचे प्रसंग घडले, त्या त्या ठिकाणी लहान मोठी स्मारके उभारण्यात आली.लुंबिनी, बुध्दगया, सारनाथ, कुशीनगर, श्रावस्ती, सांची, राजगृह आणि वैशाली [२४] ही बुध्दाच्या जीवनात महत्वाचे प्रसंग घडलेली ठिकाणे आहेत. या सर्व ठिकाणी सम्राट अशोकाने स्तूप बांधले. बौध्द स्तूप महत्वाच्या राजकीय किंवा व्यापारी महामार्गावरही बांधण्यात आले. उदा. मथुरा – विदिशा [२५] या महामार्गावर स्तूप आढळून आले. या शिवाय आदिवासी आणि दाट अरण्यातही स्तूप उभारण्यात आले. सारनाथपासून ८ कि.मी. अंतरावर एका जंगलात चौखंडी स्तूप [२६] बांधला होता. ईशान्य गुजरात, देवनी व मोरी आणि विदर्भातील पवनी [२७]ही ठिकाणे जंगलात असून या ठिकाणीही स्तूप बांधण्यात आले. देवनी आणि मोरी येथील स्तूपावर उत्तम त–हेने कोरलेल्या ॲकॅन्थसच्या पानांची सजावट आहे. मौर्य – शुंग काळात बांधलेल्या पवनी स्तूपावर विकसित कमळाचे फूल व अन्य प्रयोजने आहेत.

**स्तूप बुध्दाचे प्रतीक :**

बौध्द धर्मात हिनयान आणि महायान असे दोन पंथ होते. हिनयान पंथाचा काळ प्रारंभीचा असून या काळात बुध्दमूर्तीची पूजा प्रचलित नव्हती. या काळात गौतम बुध्दाची पूजा प्रतीकांच्या रूपात केली जात होती. बुध्दांच्या मूर्ती निर्माण होईपर्यंत प्रतीकांच्यांच रूपात बुध्दाची पूजा व उपासना केली जात होती.

बुध्दाची प्रतीके पुढीलप्रमाणे :

१. पांढरा हत्ती : बोधिसत्वांच्या कथानकानुसार पांढ–या हत्तीच्या रूपाने गौतमाने महामाया देवीच्या गर्भात प्रवेश केला. त्यामुळे पांढरा हत्ती हा बुध्द जन्माचे प्रतीक झाला.

२. कमळ : बुध्द जन्मल्याबरोबर सात पावले चालले व प्रत्येक पावलाखाली कमळ उगवले.

३. घोडा : सिध्दार्थाने तपश्चर्येसाठी घोडयावर बसून गृहत्याग केला. घोडा हा महाभिनिष्क्रमणाचे प्रतीक समजला जातो.

४. बोधिवृक्ष : सिध्दार्थाला बुध्दगया येथे पिंपळाच्या झाडाखाली ज्ञानप्राप्ती झाली. तेव्हापासून पिंपळवृक्ष हा 'बोधिवृक्ष' या नावाने ओळखला जावू लागला. पिंपळ हे संबोधी प्राप्तीचे प्रतीक झाले.

५. वज्रासन : बुध्दाने बोधिवृक्षाच्याखाली ज्या आसनावर बसून तप केला. त्या आसनाला 'वज्रासन' म्हणतात.

६. गंधकुटी : बुध्दाच्या झोपडीस 'गंधकुटी' या नावाने ओळखले जात असे. सांची व भारहूत स्तूपांवर गंधकुटीचा उल्लेख आढळतो.

७. भिक्षापात्र : बुध्दाचा भिक्षा मागण्याचा कटोरा याला 'वाडगा' असेही म्हणतात.

८. उश्णीश : हे पूर्वाश्रमातील 'पागोटे' आहे.

९. प्रभामंडळ : बुध्दाच्या मस्तकाच्या पाठीमागे दिसणारी त्यांची अलौकिक प्रभा म्हणजे 'प्रभामंडळ' होय. कुशाण व कुशाणपूर्वीच्या मथुरा कलेतच प्रभामंडळ दिसते.

१०. धर्मचक्र : ज्ञानप्राप्ती अर्थात बुध्दत्व प्राप्तीनंतर बुध्दाने सारनाथ येथे आपल्या धम्माचे पहिले प्रवचन दिले. बौध्द साहित्यात ही घटना 'धम्मचक्रप्रवर्तन' या नावाने ओळखली जाते.

११. पदचिन्ह : बुध्दांच्या पावलांचे ठसे.

१२. त्रिरत्ने : बुध्द, धम्म व संघ ही बौध्द धर्माची त्रिरत्ने आहेत.

१३. स्तूप : स्तूप हे बुध्दाच्या निर्वाणाचे प्रतीक आहे.

स्तूप हे बुध्दाच्या निर्णावाचे प्रतीक समजले गेले. त्यामुळे स्तूप या स्मारकाची पूजा उपासना सुरू केली गेली. शारिरीक, पारिभोगीक व उद्देशिक हे स्तूपाचे तीन प्रकार होते. स्तूप हे जंगलात अर्थात आडवळणाच्या जागेतही बांधले जात असत. सारनाथचा चौखंडी स्तूप, देवनी, मोरी व पवनी येथील स्तूप जंगलातच बांधण्यात आले होते. अशाच प्रकारचे स्तूप कंधार व कंधारच्या परिसरात जंगलात बांधण्यात आले. कंधारची स्थापना इ.स. ७५८ मध्ये राष्ट्रकूट सम्राट कृश्ण पहिला याने केली असली तरी यापूर्वी या ठिकाणी मानवी वसाहत होती. या भागात मौर्य, सातवाहन, कुशाण, वाकाटक आणि बदामीच्या चालुक्य काळातील पुरातत्वीय अवशेष मिळाले आहेत. मौर्य सम्राट अशोकाची [२८] स्थानक स्थितीतील खंडित प्रतिमा मिळाली आहे. कंधार व कंधार परिसरात स्तूप उद्देशिक स्तूप होते. या ठिकाणी स्तूपाचे अवशेश प्राप्त झाले आहेत. पण आज त्यांचे कसलेही अवशेष आढळत नाही.

गुहाचा उपयोग स्तूपांसाठीसुध्दा केला आहे. बुध्द ,बुध्दाचा शिश्य किंवा एखादा थोर बौध्द भिक्खू यांच्या अवशेषांवर स्तूप उभारतात.दगडांच्या चौथ–यावर अर्ध्या अंडयासारखी दगडी आकृती बांधून त्यावर छत्र उभारीत. ज्या स्तूपाची पूजा करतात त्याला चैत्य म्हणतात. चैत्य असणा–या गुहेस चैत्यगृहे म्हणतात. प्रारंभी स्तूप, चैत्य व चैत्यगृहे साधी होती. मौर्योत्तर काळात त्यांचे सौंदर्य, सजावट, आकार व आकृती यांच्यात अनेक कलापूर्ण बदल घडून आले. सांचीच्या स्तूपाचे चार सुंदर सजावटपूर्ण प्रवेशव्दारे या काळातील कलेची प्रगती दर्शवितात. या प्रवेशव्दारावर जातककथा व बुध्दाच्या जीवनातील प्रसंग चित्रित केले आहेत. सांचीशिवाय भारहूत, अमरावती वगैरे स्तूपसुध्दा उत्कृश्ट आहेत.

निष्कर्ष :

१. बौध्द धर्म हा भारतातील प्राचीन धर्म आहे.
२. वैदिक धर्मात यज्ञ व कर्मकांडाचे महत्व व वाढले होते. त्यामुळे सर्वसामान्य जनता बौध्द धर्माकडे आकर्शित झाल्याचे दिसून येते.
३. या धर्माचा भारतीय संस्कृतीवर प्रभाव पडल्याचे दिसून येते.
४. या धर्माची कला व स्थापत्य क्षेत्रात फार मोठी देणगी भारतीय संस्कुतीला मिळाल्याचे दिसून येते.
५. या धर्मात सुरूवातीला मूर्तीपूजेला प्राधान्य नव्हते.
६. या धर्मात हिनयान व महायान या दोन पंथाचा उदय झाला.
७. हिनयान पंथात मूर्तीपूजा नव्हती तर महायान पंथात मूर्तीपूजा होती.
८. वास्तुकलेत चैत्यगृह, विहार व स्तूप असे तीन प्रकार असल्याचे दिसून येते.
९. डोंगर खोदून चैत्यगृह, विहार व स्तूप या वास्तुची निर्मिती केली गेली.
१०.बुध्दाच्या निर्वाणानंतर बुध्द पूजा सुरू झाल्याचे दिसून येते.
११.स्तूप हे बुध्दाच्या निर्वाणाचे प्रतीक असल्यामुळे त्याला जास्त पावित्र्य मिळाले. त्यामुळे देवमूर्तीची प्रतिष्ठापना करणे जसे महान व पुण्याचे कार्य समजले जाऊ लागले. त्याचबरोबर स्तूप बनविणे, स्तूपाचा जीर्णोव्दार करणे व स्तूपाची पूजा व वंदना करणे हेही पुण्यकर्म समजले जाऊ लागले.
१२.पावित्र्याच्या उद्देशामुळेच सम्राट अशोकाने भारतात विविध भागात ८४,००० हजार स्तूप बांधले असावे.

संदर्भ ग्रंथ :

१. डॉ. आंबेडकर भी. रा. भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, मुंबई, १९९२,पृ. ६५.
२. देव शां. भा., तेर, मुंबई, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग,महाराश्ट्र शासन,पृ.५
३. पवार दत्ता संपा. भारतीय इतिहास आणि संस्कृती, मुंबई, इतिहास संशोधन मंडळ, त्रैमासिक, वर्ष–४४, पुस्तक– १७३, जानेवारी– मार्च २००७, पृ.२९.
४. देव शां. भा., पूर्वोक्त पृ.४
५. मित्र देवला, सांची, दिल्ली, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण ,१९९३, पृ.११–३३
६. अग्रवाल वासुदेव शरण, सारनाथ, दिल्ली, भारतीय सर्वेक्षण, १९९२, पृ.१२,१३,१९
७. Percy Brown, Indian Architecture (Buddhist & Hindu Periods), Bombay,D.B.Taraporewala Sons & Company,1971,p.17
८. Deo S.B. & Joshi J.P., Pauni Exacavation: 1969-70,Nagpur,1972,p.78.
९. डॉ. कठारे अनिल, भारतीय कला व स्थापत्य, खंड.१,नांदेड, कल्पना प्रकाशन, २००४,पृ. ५३.
१०.गोपी साधू विधार्थी, तारापूरचा अशोककालीन स्तूप, यवतमाळ, विद्यार्थी साहित्य प्रकाशन, १९९४, पृ. ४०.
११. Percy Brown, Op.Cit.,P.206
१२.Ibid, p.209.
१३.जोशी नि.पु. भारतीय मूर्तिशास्त्र, नागपूर, म.वि.ग्रं.नि.मं., १९७९,३६३.
१४.कित्ता.
१५.कित्ता.
१६.डॉ. पाठक अ.रा. (संपा), महाराश्ट्र राज्य गॅझेटिअर , महाराश्ट्र इतिहास प्राचीन काळ, खंड–१, भाग ६ –२,स्थापत्य व कला, मुंबई, दर्शनिका विभाग , महाराश्ट्र शासन , २००२,पृ.२९८.

१७.डॉ. मोरवंचीकर रा.श्री., सातवाहनकालीन महाराष्ट्र, पुणे, प्रतिमा प्रकाशन, १९९३, पृ. १९१.
१८.जोशी नि.पु. पूर्वोक्त, पृ. ३६४.
१९.Dr. Jain Ratanlal, Ajanta and Ellora,Nagpur, Vishwabhati Publications. 1978. p.15.
२०.Ibid .
२१.Tripathi R.S. History of Ancient India, Delhi, Motilal Banarasidass,1967, p.149.
२२.Thaper Romila, Ashoka and The Decline of Maurya, Delhi, Oxford University Press, 1977, p-50.
२३.मित्र देबला, सांची, दिल्ली, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, १९९३, पृ. ११.
२४.बापट पु. वि. संपा सुत्तनिपात, मुंबई, धम्मानंद ट्रस्ट, १९५५, पृ. १९६.
२५.सांकलिया ह. धी. भारतीय पुरातत्व – एक समालोचन , मुंबई, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये विभाग, महाराष्ट्र शासन, १९८९, पृ.४८.
२६.अग्रवाल वासुदेव शरण , पूर्वोक्त, पृ. १२.
२७.जोशी नि.पु. पूर्वोक्त पृ.३६२ –३६४.
२८.दळवे अरूण, राष्ट्रकूटकालीन कंधार, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, नांदेड, स्वा.रा. ती.म. विद्यापीठ,२००४, पृ. ३०७.
२९.Cousens Henry, The Architectural Antiquities of Western India, London, The India Society, 1926, p. 207.